-: प्रेसनोट दिनांक- २६/०२/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक १) स्वप्नील वसंतराव घाटगे, वय- ३९ वर्षे पद तलाठी - सज्जा जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर, वर्ग- ०३, रा.रूकडी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, २) शिवाजी नागनाथ इटलावार, वय ३२ वर्षे, पद - महसुल सहायक - तहसिलदार ऑफीस शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर वर्ग - ०३ सद्या रा. राजु नाईकवडी यांचे घरी भाडयाने, शाहु कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर मुळ रा. कुंडलवाडी, ता. बिलोली, जि.नांदेड यांनी लाच मागणी केलेबाबत.....**

---

तकारदार यांचे संबधीत यांची जयसिंगपूर ता.शिरोळ जि.कोल्हापूर या ठिकाणी गट नं.८७ येथे जमीन आहे. सदर जमीनीमधील प्लॉटच्या क्षेत्रफळामध्ये तफावत असल्याने त्याचे क्षेत्रफळ दुरूस्ती करून नोंद होवून तसा ७/१२ चा उतारा मिळणेकरीता संबधीताचे वतीने तकारदार हे काम पाहत होते. सदर काम जयसिंगपूर तलाठी कार्यालयात आहे. सदरच्या कामाबाबत माहिती घेणेसाठी तकारदार हे जयसिंगपूर तलाठी घाटगे यांना भेटले असता त्यांनी त्यावेळी तकारदार यांचेकडुन २२,०००/- रू. मागणी केले सदरचे पैसे हे शासकीय फी असावी असे समजुन तकारदार यांनी तलाठी घाटगे यांना दिले होते. त्यानंतर सदरच्या कामाकरीता तकारदार हे तलाठी घाटगे यांना भेटले असता त्यांनी तकारदार यांचेकडे पुन्हा ३५,०००/- रू.ची मागणी केली.त्यावेळी तकारदार यांनी पुर्वी पैसे दिल्याचे सांगितले असता तलाठी घाटगे यांनी ते तलाठयांचे प्रोटोकॉलसाठी होते आता तहसिलदार यांचा प्रोटोकॉल साठी द्यावे लागतील असे म्हणुन तकारदार यांचेकडे ३५०००/-रू ची मागणी केली. त्यामुळे तकारदार यांनी ॲन्टी ब्युरो,कोल्हापूर कार्यालयाकडे जयसिंगपूर तलाठी घाटगे हे लाच मागत असलेबाबात तकार दिली.

तकारी यांचे तकारीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये **आरोपी लोकसेवक स्वप्नील वसंतराव घाटगे, तलाठी - जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी तकारदार यांचेकडे** जयसिंगपूर ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील गट नं.८७ या जमीन गटामध्ये असलेल्या क्षेत्रफळाची दुरूस्ती करून ७/१२ उतारा देण्याचे कामाकरीता तहसिलदार यांचा प्रोटोकॉल म्हणून तहसिलदार शिरोळ यांचेकरीता २०,०००/- रू. तसेच तहसिलदार शिरोळ कार्यालयातील क्लार्क **शिवाजी इटलावार** यांचेकरीता ५,०००/- रू. व खाजगी टायपिस्ट इसम यांचेकरीता २५०० रू.असे एकुण मिळुन २७,५००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाले आहे. तसेच तहसिलदार शिरोळ कार्यालयातील क्लार्क शिवाजी विठ्ठलवार यांनी तलाठी स्वप्निल घाडगे यांनी सांगितलेप्रमाणे तकारदार यांचेकडे त्यांचेकरीता ५०००/- रू.लाच मागणी केल्याचे निषन्न झाले आहे.

आरोपी लोकसेवक **१) स्वप्नील वसंतराव घाटगे, तलाठी - जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर,रा.रूकडी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, २) शिवाजी नागनाथ इटलावार, महसुल सहायक - तहसिलदार ऑफीस शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर सद्या रा. राजु नाईकवडी यांचे घरी भाडयाने, शाहु कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर मुळ रा. कुंडलवाडी, ता. बिलोली, जि.नांदेड** यांचेविरुध्द जयसिंगपूर पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा.श्री विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच श्री. सरदार नाळे, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार श्रीमती आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, सपोफौ प्रकाश भंडारे, पोहेकॉ अजय चव्हाण, पोहेकॉ विकास माने, पोना सुधिर पाटील, पोना सचिन पाटील, पोकॉ संदिप पवार, चापोहेकॉ सुरज अपराध व विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३)श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४. ५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

Scanned by CamScanner